# व्यापारी सहकारी बँक मर्यादित, सोलापूर
# Vyapari Sahakari Bank Maryadit, Solapur
452, West Mangalwar Peth, SOLAPUR - 413 002. (Maharashtra)
Ph. 0217 - 2328176, 2729997, 2326050 Email : headoffice@vyaparibank.com


॥ सहकारात संपन्नता ॥

## ५५ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस
## (फक्त सभासदांसाठी)

व्यापारी सहकारी बँक मर्यादित, सोलापूर या बँकेची सन २०२४-२५ ची ५५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा बुधवार दि. २०/०८/२०२५ रोजी दुपारी ठीक ४.०० वाजता माहेश्वरी सांस्कृतिक भवन, १७६/४, भवानी पेठ, तुळजापूर वेस, सोलापूर येथे खालील विषयांवर विचार करण्यासाठी आयोजित केली आहे. तरी कृपया सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे, ही विनंती.

### * सभेपुढील विषय *

१) दिनांक २३/०८/२०२४ रोजी झालेल्या ५४ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा वृत्तांत वाचून कायम करणे.
२) सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाचा अहवाल, ऑडीटेड ताळेबंद पत्रक, नफा-तोटा पत्रक स्वीकृत करणे.
३) सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाचे वैधानिक लेखापरीक्षकांचा लेखापरीक्षण अहवाल स्वीकृत करणे व सन २०२३-२४ च्या वैधानिक अहवालाचा दोष दुरुस्ती अहवाल माहितीसाठी.
४) सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाचा निव्वळ नफा वाटणीची मंजुरीसाठी शिफारस करणे.
५) सन २०२४-२५ या आर्थिक वर्षामध्ये अंदाजापेक्षा जास्त झालेल्या खर्चास मंजूरी देणे तसेच सन २०२५-२६ या सालाकरिता अंदाजपत्रक मंजूर करणे.
६) सन २०२५-२६ सालाकरिता संचालक मंडळाने शिफारस केलेल्या वैधानिक लेखापरीक्षक यांची नेमणूक करणे, तसेच सतत व समवर्ती लेखापरीक्षकांची नेमणूक करणे बाबत.
७) सन २०२५-२६ या सालाकरिता बाहेरून उभे करावयाची कर्ज मर्यादा ठरविणे.
८) महाराष्ट्र शासनाच्या "एकरकमी कर्ज परतफेड योजना-२०२४" अंतर्गत तडजोड केलेल्या थकीत कर्जखात्यांची नोंद घेणे.
९) बँकेच्या रु. १०००/- दर्शनी किंमत असणाऱ्या अधिकृत भागभांडवलाची मर्यादा जास्त झाल्याने जे जास्त झालेले भागभांडवल बाबत दुरुस्तीस मान्यता देणेबाबत.
१०) बँकेचे पोट नियम क्र. ८ दुरुस्तीस मंजूरी देणेबाबत.
११) बँकेचे संचालक व त्यांचे नातेवाईक यांना दिलेल्या कर्जाबाबत माहिती घेणे.
१२) सभासदांना सहकार व बँकिंग संबंधी तज्ञ व्यक्तीकडून प्रशिक्षण देणे.
१३) मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी येणाऱ्या विषयावर चर्चा करणे.

मा. संचालक मंडळाच्या आदेशावरून
सही xxx
(मोहन हरी झिंगाडे.)
मुख्य कार्यकारी अधिकारी

स्थळ : सोलापूर
दिनांक : ०५/०८/२०२५

---

**सूचना:-**

१) गणसंख्या (कोरम) अभावी सभा तहकूब झाल्यास ती सभा त्याच दिवशी, त्याच ठिकाणी अर्ध्यातासानंतर घेण्यात येईल. या सभेस गणसंख्येची जरुरी असणार नाही.
२) सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाचे लेखापरिक्षीत ताळेबंद, नफातोटा पत्रक व अहवाल, सन २०२५-२६ वर्षाचा अंदाजपत्रक, अहवाल बँकेचे मुख्य कार्यालय व सर्व शाखांमध्ये सभासदांसाठी महितीस्तव उपलब्ध करून ठेवले आहे.
३) ताळेबंद व नफा - तोटा पत्रकासंबंधी सभेत काही माहिती विचारावयाची असल्यास सभासदांनी बुधवार दिनांक १३/०८/२०२५ पर्यंत बँकेच्या वेळेत मुख्य कार्यालयात मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे लेखी कळविल्यास, माहिती देणे सोयीचे होईल. त्यानंतर आलेल्या प्रश्नाचा विचार केला जाणार नाही.
४) ज्या सभासदांनी शेअर सर्टिफिकेट व मागील लाभांश (डिव्हीडंड) नेले नसतील, त्यांनी ते मुख्य कार्यालयातून घेऊन जावे.सहकार कायद्यानुसार ३ वर्षात लाभांश न घेतल्यास सदरची रक्कम रिझर्व्ह फंडात वर्ग केली जाते.
५) सहकारी कायद्यानुसार सभासदांनी बँकेत वारस नोंद केली नसल्यास त्यांनी त्वरित वारस नोंद करून घ्यावी.
६) आपला पत्ता बदलला असल्यास मुख्य कार्यालयात नवीन पत्याची नोंद करून घ्यावी. तसेच सभासदांनी पॅनकार्ड, आधारकार्ड, ओळखपत्र, फोटो व पत्याचा पुरावा (झेरॉक्स) व मोबाइल नं. बँकेत आणून द्यावे, ही विनंती.

Scanned with OKEN Scanner

## बँकिच्या प्रगतीचा तुलनात्मक तक्ता ३१ मार्च अखेर (रुपये लाखांत)

| तपशील | २०२०-२१ | २०२१-२२ | २०२२-२३ | २०२३-२४ | २०२४-२५ |
|---|---|---|---|---|---|
| भाग भांडवल | ६३४.९४ | ६९३.०७ | ७४९.२८ | ७९३.५५ | ८२३.१६ |
| गंगाजळी व इतर निधी | २४६२.३४ | २९२९.११ | ३४५४.४४ | ३८९१.३६ | ४३८८.२२ |
| ठेवी | २६६४७.०२ | २७७६७.७४ | २८१०७.७४ | ३०१४४.२३ | ३२९२४.६८ |
| दिलेली कर्जे | १७९१३.५६ | १७२०९.६७ | १८४३६.०५ | २०४४१.५५ | २२७१७.८८ |
| नेट एन.पी.ए% | ०.८८% | १.३९% | ०.००% | ०.००% | ०.००% |
| खेळते भांडवल | ३१२२६.२० | ३२३९३.१० | ३३१६५.४० | ३६२४२.७२ | ३८६६६.७५ |
| निव्वळ नफा | ११२.२८ | १५१.८६ | २५३.०५ | २८२.१० | ३१२.०० |
| ऑडिट वर्ग | अ | अ | अ | अ | अ |
| सभासद संख्या | ४०५९ | ४२४० | ४४४८ | ४७११ | ४९२६ |

बुक-पोस्ट

प्रति,


Vyapari Sahakari Bank Maryadit, Solapur

व्यापारी सहकारी बँक मर्यादित, सोलापूर

॥ सहकारात संपन्नता ॥

452, West Mangalwar Peth, SOLAPUR - 413 002.

Ph. 0217-2328176, 2729997, 2326050 Email : headoffice@vyaparibank.com


Scanned with OKEN Scanner